MHJN080011342022

**निशाणी क्रमांक २० खाली आदेश**
(पारीत दि.०६/०१/२०२४)

प्रस्तुतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर घेण्याकरीता दाखल करण्यात आला आहे. सोबत वादी क्र.१ चे शपथपत्र दाखल आहे.

२) वादींतर्फे ॲड. श्री. डी.बी.शिवतारे व प्रतिवादी क्र. २ ते ४ तर्फे ॲड. श्री. पटेल यांचा युक्तीवाद ऐकला.

३) वादींनी असे कथन केले की, प्रतिवादी क्र. १ हे दि.२९/०१/२०२२ रोजी मयत झाले असून त्यांना पाच मुले होती. त्यापैकी संजय अंबादास टोळे मयत आहे. संजय यांचे वारस त्याची पत्नी व दोन मुले व एक मुलगी असून अंबादास यांना एक पत्नी व चार मुले आहेत. तरी त्यांना दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १ चे कायदेशीर वारस म्हणून समाविष्ट करणे गरजेचे आहे. म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला.

४) प्रतिवादींनी कथन केले की, प्रतिवादी क्र. १ हा दिनांक २९/०१/२०२२ रोजी मयत झालेला आहे व प्रस्तुतचा दावा दिनांक ११/१०/२०२२ रोजी दाखल केला. प्रतिवादी क्र. १ मयत झाल्याच्या ८ महीने १२ दिवसानंतर दावा दाखल केला आहे. अर्जात नमूद वारसांचा दाव्याशी कोणताही संबंध नाही. अर्जात नमूद वारस हेच प्रतिवादी क्र. १ चे वारस असल्याबाबत वादींनी कोणताही पुरावा सादर केला नाही. अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती त्यांनी केली.

५) अर्जाचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होत आहे की, प्रतिवादी क्र. १ हे दि.२९/०१/२०२२ रोजी मरण पावले आहेत. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. २ ने दिनांक २०/०६/२०२३ रोजी निशाणी १५ प्रमाणे पुरसिस दाखल करुन त्याच्यासोबत प्रतिवादी क्र. १ च्या मृत्युप्रमाणपत्राची प्रत दाखल केली आहे. त्यावरुन असे स्पष्ट होते की, प्रतिवादी क्र. १ हे २९/०१/२०२२ रोजी मयत झाले आहेत.

६) निशाणी ६ वरील बेलीफ अहवालावरुन असे स्पष्ट होते की, त्यामध्ये देखील प्रतिवादी क्र. १ मयत झाल्याचे नमूद आहे. सदरचा अहवाल दिनांक १३/०४/२०२३ रोजीचा आहे. प्रस्तुतचा दावा दिनांक ११/१०/२०२२ रोजी दाखल करण्यात आला आहे व प्रतिवादी क्र. १ हे दिनांक २९/०१/२०२२ रोजीच मयत झाले आहे. प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दिनांक ३०/१०/२०२३ रोजी दाखल करण्यात आला आहे.

७) अर्जात नमूद वारसांव्यतिरीक्त मयत प्रतिवादी क्र. १ ला इतर वारस आहेत, याबाबत प्रतिवादींनी कथन केलेले नाही. प्रस्तुतचा दावा हा मौजा मच्छिंद्रनाथ चिंचोली येथील गट क्र. ६२२ मधील १५ आर शेतजमिनीची वाटणी होऊन ताबा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. अशा स्थितीमध्ये मयत प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर असणे गरजेचे आहे. मयत प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर घेण्यास उशीर झालेला आहे. त्यामुळे अर्ज खर्चासह मंजूर करणे उचित ठरणार आहे. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## **आदेश**

१) अर्ज एकुण रुपये ५००/– च्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

२) वादींनी खर्चाची रक्कम मयत प्रतिवादी क्र. १ च्या वारसांना द्यावी.

३) वादींनी रक्कम दिल्यानंतर मयत प्रतिवादी क्र. १ चे अर्जात नमूद वारस अभिलेखावर घ्यावे.

४) मयत प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर घेतल्यानंतर त्यांना दाव्याचे समन्स पाठविण्यात यावे.

स्वा/-

(**स. भा. शिरसाठ**)

दिनांक : ०६/०१/२०२४

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
घनसावंगी.